महाराष्ट्र शिक्षण सेवा गट ब (तां.) या संवर्गातील सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तां.) या पदावर सरळसेवेने नियुक्ती.

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

शासन आदेश क्रमांक: व्यशिअ-२०१५/(४३८/१५)/व्यशि-१,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

विस्तार भवन, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.

दिनांक: २१ नोव्हेंबर, २०१७.

संदर्भ :- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे गोपनीय पत्र क्र.१५(२)(१८३)/७१०/सात-अ, दिनांक १६.१२.२०१६.

आदेश

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत महाराष्ट्र शिक्षण सेवा गट - ब (तांत्रिक) या संवर्गातील सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तां.) या पदांवर वेतनश्रेणी रु.९३००-३४८००/- ग्रेड पे रु.४८००/- मध्ये खाली नमूद केलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवारांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये, ते ज्या दिनांकापासून पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून २ वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी त्यांची नामनिर्देशनाद्वारे तात्पुरती नियुक्ती खालीलप्रमाणे करण्यात येत आहे:-

अ. क्र.	उमेदवाराचे नाव	वर्गवारी	शिफारस	नामनिर्देशनाद्वारे करावयाचे नेमणुकीचा विभाग व ठिकाण
१	२	३	४	५
१	श्रीमती सुनिता निवृत्तीराव पवार	OBC	OBC General	**(कोकण-१ विभाग)** सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वाणगांव, जि.पालघर. (रिक्त जागी)

अ. क्र.	उमेदवाराचे नाव	वर्गवारी	शिफारस	नामनिर्देशनाद्वारे करावयाचे नेमणुकीचा विभाग व ठिकाण
१	२	३	४	५
२	श्री.तुषार चित्रघ्न लोखंडे	S.C.	PH	**(नागपूर विभाग)** सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गोंदिया, जि.गोंदिया. (रिक्त जागी)

२. सदर नियुक्ती खालील अटींच्या अधीन राहील :-

i) मागासवर्गीय उमेदवारांचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या मुदतीत प्राप्त न झाल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

ii) उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती सरळसेवा प्रवेश नियुक्तीसाठी विहीत केलेल्या नियमाच्या अधीन राहून ते यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्या परीक्षा त्यांना विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांची एक वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

iii) उपरोक्त उमेदवारांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रशिक्षण-२०००/ प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/०३/२००३ मधील तरतुदीनुसार संगणक हाताळणे/वापराबाबतचे शासन मान्यताप्राप्त प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत विभाग प्रमुखाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

iv) परिविक्षाधीन कालावधीत संबंधित उपरोक्त उमेदवारांनी कामाचा दर्जा प्राप्त न केल्यास किंवा विहीत विभागीय परीक्षा काही असल्यास विहीत कालावधीत उत्तीर्ण न केल्यास किंवा त्यांचे काम किंवा वर्तणूक समाधानकारक न आढळल्यास त्यांना कोणतीही पूर्व सूचना न देता सेवेतून कमी करण्यात येईल.

v) उपरोक्त उमेदवारांची महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (तां.) या संवर्गातील ज्येष्ठता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गुणवत्ताक्रमानुसार आणि विहीत मुदतीत त्यांनी त्यांच्या पदाचा कार्यभार स्विकारल्यावर/मुदतवाढीवर अवलंबून राहील.

vi) उपरोक्त उमेदवारांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात यावे.

vii) उपरोक्त उमेदवाराला शासन निर्णय, शालेय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक:एससीटी ६५६३/ए, दि.१८ जानेवारी, १९६३ अन्वये विहीत करण्यात आलेला करारनामा करावा लागेल. याबाबत संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

viii) वरील उमेदवाराने त्याच्या नावासमोर निर्देशिलेल्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत रुजू व्हावे.

ix) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:अंनियो-१००९/प्र.क्र.३२/सेवा-४, दि.१८/८/२००९ मधील तरतुदीनुसार दि.१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तिवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे त्याच किंवा अन्य विभागातील निवृत्तिवेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील नियुक्तीसाठी दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी किंवा त्यानंतर अर्ज केला असेल तर अशा प्रकरणी शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक:अंनियो-१००६/८७/सेवा-४ दि.१२ जानेवारी, २००७ मधील (i) ते (iv) येथे नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन), नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील. दि.१८/८/२००९ च्या परिपत्रकात नमूद (i) ते (iv) येथील अटींची पूर्तता ज्या प्रकरणी होत नसेल, अशा शासकीय कर्मचाऱ्यास नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल.

३. उपरोक्त उमेदवारांना वर नमूद केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील राज्यसेवा अधिकाऱ्यांना जे सेवाविषयक नियम लागू आहेत ते लागू होतील.

४. उपरोक्त उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता देण्यात येणार नाही.

५. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांना संबंधित पदावर रुजू करुन घेण्याची कार्यवाही तात्काळ करावी व केलेल्या

कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा. तसेच या संबंधीची आवश्यक ती अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

६. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र.: २०१७११२११६४०२८०६०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dr.Manish Sheshrao Milke

Digitally signed by Dr.Manish Sheshrao Milke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development And Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=116b8d4fe32ec9c9f7698810f585f3247df16981777aa4a590ca4347b30d6d0c, cn=Dr.Manish Sheshrao Milke
Date: 2017.11.21 16:45:22 +05'30'

(डॉ.मनिष शे.मिलके)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई-१.
२) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ५$^{१/२}$, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई-४०० ०२१.
३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
४) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
५) संबंधित सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय (संचालकांमार्फत).
६) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (संचालकांमार्फत)
७) संबंधित उपकोषागार अधिकारी, (संचालकांमार्फत)८)
८) श्रीमती, सुनिता निवृत्तीराव पवार, उमा रो हाऊस नं११, वृंदावन नगर, विखेपाटील रोड, कामटवाडे, ता. जि.नाशिक.
९) श्री.तुषार चित्रघ्न लोखंडे, द्वारा, श्री.एन.एस.मेंडूलकर, सिव्हिल लाईन्स, रामनगर, डॉ.मुठाळचे बाजुला, चंद्रपूर-४४२ ४०१.
१०) निवड नस्ती (व्यशि-१)

प्रत-

१) मा.मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे खाजगी सचिव.
२) मा.राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे खाजगी सचिव.
३) मा.सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.